**इतर फौ. कि. अर्ज क्र. २८०/२०२२**
**किशोर काशिनाथ पवार वि.ग्रा.पं.खुपरी**

## <u>निशाणी क्र.०१ खालील आदेश</u>
**(CNR No. MHTH21000908-2022)**

०१. प्रस्तुतचा अर्ज जन्म व मृत्यु नोंदनी अधिनियम १९६९ च्या कलम १३(३) अन्वये जन्म प्रमाणपत्र मिळणे बाबत दाखल केला आहे.

०२. अर्जदार असे कथन करते की, त्यांचा जन्म दि. १३/०७/१९९० रोजी मौजे भोईरपाडा खुपरी, ता.वाडा, जि. पालघर येथे झाला आहे. अर्जदार यांच्या आई—वडीलांच्या नजरचुकीने त्यांच्या जन्माची नोंद ग्रामपंचायत खुपरी, ता.वाडा, जि.पालघर यांच्याकडे केली नाही. अर्जदाराला शासकीय तसेच निमशासकीय कामाकरीता जन्म प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने अर्ज मंजुर होण्यास विनंती केली आहे.

०३. अर्जदाराने त्याचे शपथपत्र नि.क्र. ७ अन्वये दाखल केले. त्यांनी त्यांच्या शपथपत्रात अर्जाशी सुसंगत बाबी शपथेवर कथन केले आहेत. त्याच बरोबर ग्रामपंचायत खुपरी, ता. वाडा, जि.पालघर यांनी अर्जदाराची जन्म नोंद नसल्याबाबत त्यांचे म्हणणे नि. क्र. ६ वर दाखल आहे. तसेच अर्जदार यांचे ओळखपत्र दप्तरी दाखल केले आहेत.

०४. सदर प्रकरणात दिनांक १२/११/२०२२ रोजीच्या ठाणे वैभव या वर्तमान पत्रात जाहीर प्रगटन केले असता कोणाचाही आक्षेप आला नाही. तसेच त्यामुळे सदर प्रकरण विना हरकत, विना उजर राहिले आहे.

०५. अर्जदाराचा पुरावा व संपूर्ण दस्ताऐवजाचे अवलोकन केले असता व विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. अर्जदार यांचा जन्म दि. १३/०७/१९९० रोजी मौजे भोईरपाडा खुपरी, ता.वाडा, जि. पालघर येथे झाल्याचे निदर्शनास येते. परंतु त्यांच्या जन्माची नोंद संबंधीत कार्यालयात केली नसल्याचे दिसुन येते. त्यामुळे जन्म व मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ च्या कलम १३(३) अन्वये संबंधीत अधिकारी यांना त्यांच्या जन्माची नोंद घेण्यास निर्देशीत करणे विधिसंगत वाटते. करीता खालील आदेश पारीत करण्यात येतो.

# <u>आदेश</u>

०१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

०२. संबंधीत अधिकारी यांना निर्देशीत करण्यात येते की, नियमाप्रमाणे शुल्क भरल्यानंतर, अर्जदार किशोर काशिनाथ पवार यांचा जन्म दि. १३/०७/१९९० रोजी मौजे भोईरपाडा खुपरी, ता.वाडा, जि. पालघर येथे झाल्याची नोंद संबंधीत नोंदवहीत नोंदवावी.

०३. येणे प्रमाणे संबंधीतास पत्र पाठविण्यात यावे.

दिनांक : २३/०२/२०२३.

(आर. व्ही. निकम )
प्रथमवर्ग न्यायादंडाधिकारी वाडा